जा क्र मसके/प्रअपां/ठेका/ ०९/ ५१३ /२०२२
मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली
दिनांक : 18 FEB 2022

प्रती,

मा.व्यवस्थापक
कृषिज्ञान व्यवस्थापन कक्ष,
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली

विषय : पांगारी विभागाअंतर्गत कंत्राटी कामे जाहीरातीस विद्यापीठ संकेतस्थळावर (www. dbskkv.org) प्रसिध्दी देणे बाबत....

महाशय,

उपरोक्त विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, या केंद्रास पांगारी विभागातील आंबा बागेत पहाराचौकी ठेका पदध्तीने तयार करावयाच्या आहेत. त्याबाबतची प्रसिध्दी विद्यापीठ संकेतस्थळावर (www. dbskkv.org) करणेस विनंती आहे. सोबत प्रसिध्दी नमूना जोडणेत येत आहे.

आपला विश्वासू,

सोबत : वरील प्रमाणे.

संचालक,
मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली,
ता. दापोली, जि. रत्नागिरी

File no 75 pahara choki bandhne

जा क्र मसके/प्रअपां/टेका/ /513/२०२२
मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली
दिनांक : 18 FEB 2022

प्रति,

______________________

______________________

______________________

______________________

# जाहीर नोटीस

मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली अंतर्गत पांगारी येथील प्रक्षेत्रावर खालिल प्रमाणे कामे करावयाची आहेत. त्यासाठी दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

| अ क | कामाचा तपशिल |
|---|---|
| १ | जमिनिमध्ये लाकडी मेढी उभ्या करणेसाठी खडडे काढणे, जंगली लाकडांच्या मेढी काढणे व खडडयांमध्ये व्यवस्थित बसवून ५' उंचीची व लाकडी साहीत्य वापरून ६' x ८' आकाराची मचान तयार करणे, मचानावरती ६' उंचीवर गवत व नारळाची झापे वापरून छप्पर तयार करणे |

उपरोक्त प्रमाणे प्रक्षेत्रावरील कामे ठेका पध्दतीने करावयाची आहेत. कामाच्या अटी व शर्ती इत्यादी माहिती तसेच भरून दयावयाचे संमतीपत्र आणि दरपत्रक नमूना या कार्यालयात कार्यालयीन कामाच्या दिवशी व कार्यालयीन वेळेत उपलब्ध होईल. कंत्राटी कामाचे दरपत्रकामध्ये प्रती मजुर, मजुरी दराचा स्पष्टपणे उल्लेख करावा. दरपत्रक या कार्यालयाने तयार केलेल्या नमूना पत्रामध्येच भरून द्यावयाचे आहे. आपले दरपत्रक आणि संमतीपत्र या कार्यालयात दिनांक २१.०२.२२ पर्यंत किंवा त्यापुर्वी पोहोचेल असे पाठवावे. विहीत दिनांकानंतर प्राप्त होणा-या दरपत्रकांचा विचार करण्यात येणार नाही. लखोटयावर **"पांगारी विभागाअंतर्गत कंत्राटी कामे"** असा उल्लेख करावा, लिफाफा मोहोरबंद करून मा. संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली (पांगारी विभाग) यांचे नावे पाठवावा. पोस्टाव्दारे होणा-या विलंबास हे कार्यालय जबाबदार असणार नाही. दरपत्रक स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांचा राहील. दरपत्रकाच्या अटी व शर्ती सोबत जोडण्यात येत असून त्या ठेकेदारास बंधनकारक असतील. सदर अटी व शर्ती मान्य असल्यास दरपत्रक सादरीकरणाचे वेळी मान्यतेबाबत स्वाक्षरी करून दरपत्रकासोबत जोडण्यात याव्यात.

प्रभारी अधिकारी,
पांगारी विभाग
मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली